# मानवतेचा संदेश

सार्वजनिक सभेतील व्याख्याने ज्यात
जीवनविषयी समस्यांवर नव्या दृष्टिकोनातून
विचार करण्यास तसेच निराळे प्रयत्न
करण्याचे आह्वान केले आहे.

## सैय्यद अबुलहसन अली नदवी

* अनुवादक *

शेख फिरोज अब्दुल हकीम (एम. ए. बी. एड.)
यासीन मास्जिद रोड, कटकट गेट, औरंगाबाद.

* प्रकाशक *

**अली मियाँ नदवी लायब्रेरी**

मुस्लिम नगर, मालेगांव - ४२३ २०३ (नाशिक)

www.abulhasanalinadwi.org

# लेखकाचा परिचय

देशप्रेम, निःस्वार्थ समाजसेवा आणि विव्दत्तेची दीर्घ परंपरा असलेल्या, उत्तर प्रदेशातील रायबरेली येथे एका प्रतिष्ठित घराण्यात, मौलाना सैय्यद अबुल हसन अली नदवी यांचा सन १९१४ मध्ये जन्म झाला. मौलाना नदवींनी उर्दु-अरबी भाषेत इस्लामी तत्वज्ञान, साहित्य आणि इतिहास इ. विषयावर २०० हून अधिक पुस्तके लिहिली होती. ही पुस्तके इंग्रजी, मराठी, तुर्की, फारसी, फ्रेंच, इंडोनेशियन, फिलपींनी, मोरोक्को, हिन्दी, बंगाली, जर्मन, स्पॅनिश, तेलगू व इतर विदेशी भाषामध्ये भाषांतरित झालेली आहेत. इस्लामी अध्यापनाच्या विशेष सेवेसाठी 'मलिक फैसल पारितोषिक' बहाल करून सौदी अरेबिया सरकारतर्फे त्यांचा गौरव करण्यात आला होता.

मौलान नदवींनी सन १९७४ मध्ये 'पयामे इन्सानियत' (मानवतेचा संदेश) नावाची चळवळ सुरू केली होती आणि विभिन्नधर्मीय लोकांमध्ये आपापसात सलोखा, प्रेम, सहिष्णुता आणि बंधुत्वाची भावना वाढविण्यासाठी, भारतभ्रमण करून उल्लेखनीय असे कार्य केले होते.

दि. ३१ डिसेंबर १९९९ रोजी मौलाना सैय्यद अबुल हसन अली नदवी यांचा निधन झाला.

**मौलाना सध्या खाली पदांवर कार्यमग्न होते:**

कार्याध्यक्ष : दि. इस्लामिक सेंटर ऑक्सफोर्ड विद्यापीठ (इंग्लंड)
कार्याध्यक्ष : फौंडेशन फॉर स्टडीज अॅन्ड रिसर्च (लक्झिम्बर्ग)
कार्याध्यक्ष : वर्ल्ड फोरम ऑफ इस्लामिक लिटरेचर
संस्थाप्रमुख : नदवतुल-उलमा, लखनौ (भारत)
अध्यक्ष : शिबली अकॅडमी, आजमगढ (भारत)
अध्यक्ष : अकॅडमी ऑफ इस्लामिक रिसर्च अॅन्ड पब्लिकेशन्स (लखनौ)
अध्यक्ष : ऑल इन्डिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड (नवी दिल्ली)
सभासद : अकॅडमी ऑफ आर्टस अॅन्ड लेटर्स दमास्कस (सीरिया)
सभासद नॅशनल फौंडेशन फॉर ट्रन्सलेशन, रिसर्च अॅन्ड स्टडीज, कारथेज (ट्यूनेशिया)
सभासद : अकॅडमी ऑफ रिसर्च इन इस्लामिक सिव्हिलिझेशन (जॉर्डन)
सभासद : फेडरेशन ऑफ इस्लामिक युनिव्हर्सिटीज रबात (मोरोक्को)
सभासद : अॅडव्हायझरी कमेटी मदीना विद्यापीठ (सौदी अरेबिया)



www.abulhasanalinadwi.org

# मनोगत

या संकलनात हजरत मौलाना सैय्यद अबुलहसन अली नदवीनी जानेवारी १९५४ मध्ये पाच महानगरात पांच विराट सभांना संबोधित केले होते. या सभेत हिन्दु मुस्लमान व्यतिरिक्त इतर सर्व धर्मांचे मान्यवर मोठ्या संखेने उपस्थित होते.

जे विचार त्यांनी मांडले ते सर्वांनाच आवडले व मान्यवरांनी सहमती व्यक्त केली. शहरात कित्येक दिवस सदभावना नांदत राहिली मौलांनी सर्वसामान्य तथ्यांवर विचार मांडलेत पण अशा नाविण्य रीतीने ते मांडले गेलेत की ज्यांचा ठसा प्रत्येकाच्या मनावर उमटलेला दिसला.

हजरत मौलाना नदवींनी सांगितले की ..............

मानवजगताची महत्तम आवश्यकता ही की स्वार्थ, पक्षपात आणि राजकीय हेतू पासून मुक्त नि विरक्त होऊन सर्वसामान्य मानवासमोर ती तथ्ये मांडावीत की ज्यावर मानवतंची मुक्ति नि सुरक्षितता टिकून आहे. या तथ्यांच्या अबहेलने मुळे आमची सगळी संस्कृति आणि संपूर्ण मानव समाजच यावेळी मोठ्या संकटात वा मृतावस्थेतील शेवटचे श्वास घेताना दिसत आहे. ह्यातथ्यांचे वर्णन आपापल्या काळात प्रेषितांनी केले होते. त्यांच्या आटोकात प्रयत्नांमुळेचा ही तथ्ये अजून जीवित आहेत. परंतु राजकीय चळवळी, आर्थिक संघटना आणि राष्ट्रीय स्वार्थाचा इतका फोफाटा उडविला की ज्यात ही तेजोमय तथ्ये अगदी अंधुक



www.abulhasanalinadwi.org

बनली आहेत, पण मानवी आत्मा अजून निर्जीव आणि मानसाचे मन अजूनही निष्क्रिय झालेली नाही. जर पूर्ण नि:स्वार्थ आणि निष्ठेने या तथ्यांना सर्वसामान्य भाषा व आकर्षक रीतीने मांडल्याने मनुष्याची आत्मा निमन कार्यान्वित होऊ शकते व ते मोठ्या शिताफीने या तथ्यांशी समरस होऊ शकते बहुदा असे वाटू लागते की वक्त्याने त्यांच्या मनातील व्यशाच मांडली आहे.

नि:स्वार्थ आवाहन प्रमेश्वर भक्ति, मानव मैत्रीची चळवळ सारख्या गुणांचा अनुभव या सभांव्दारे लाभला. सामान्यजनात खरी गोष्ट मान्य करण्याची मोठी क्षमता आहे आणि धर्मात अजून देखील अशी काही शक्ति आहे की जी कोणत्याही चळवळीत वा पक्षात पहाव्यास मिळणार नाही. यातून असा तर्क काढला जातो की लोक भौतिकता आणि वर्तमान स्थितीने असमाधानी आहेत. अशा स्थितीवर सहानुभूतिने केलेली टीकाते ऐकून घेऊनशक्तात निजणू त्यांचे मन यांचे समर्थनच करते.

आशा बाळगतो की जशी हो व्याख्याने आवडीने ऐकली गेली तशीच तो छापील आवस्थेत देखील लक्षपूर्वक वाचली जातील.

मोहम्मद राबे नदवी
-सचीव, मजलिसे तहकीकात
व नशरियाते इस्लाम.२/१/९४ हि.

**********



www.abulhasanalinadwi.org

गंगाप्रसाद मेमोरियल हॉल, लखनऊ येथील दिनांक ९ जानेवारी १९५४ रोजी एका संयुक्त सभेस मौलाना नदवींनी संबोधित केले. या सभेत प्रतिष्ठित मान्यवर तसेच मुस्लिम विचारखंतदेखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इतिहासाचे अध्ययन

मित्रांने आणि बंधूनो, आपणापैकी अनेकांनी इतिहासाचे वाचन केले असेलच. मनुष्य आज नवा नव्हे. तो. सहस्त्रा वर्षा पासून या पृथ्वीवर जीवन जगत आहे. त्याचा शत्कानुशतके वर्षांचा इतिहास सुरक्षित आहे. या इतिहासाची पातळी पाण्याप्रमाणे समान व समतल नाही. यात अनेक चढउतार दिसून येताव. यात मुनष्य कुठे महान तर कुठे अगदी खालच्या पातळीवर दिसून येतो. कधीतर असाभास होऊ लागतो की हा मुनष्य जातीचा इतिहास होऊच शकत नाही. हे रक्तपात काणाऱ्या टिंस्त्र पशूचे इतिहास आहे. मनुष्य जातीचे इतिहास होणे शक्यच नाही. अशाया अध्यानामुळे मनुष्याची मान लज्जेने वाकून जाते. त्यास वाटते की आपल्यापैकीच हे मानव होते. याचा निर्णय तर येणाऱ्या पिढया करतील की आम्ही व तुम्ही कशी माणसे होती. पण असा अनुमान आम्ही काढू शकतो की मानवाचा मागील कारकीर्द कशी आहे. यात कित्येक असे युग दिसून येतात की अशा इतिहासाला इतिहासातुन काढून टाकावे.


www.abulhasanalinadwi.org

अशा इतिहासास मुलांच्या हाती देण्यास आम्ही मुळीच तयार नाही. मला याची तपशील सांगायची नाही. पण मला त्या तत्याकडे आपले लक्ष वेधावेसे वाटते की इतिहासात असेजे घृणात्मक नि दु:खदायी युग निर्माण झाले त्याला कारणे कोणती होती.

समाजात निघाडाची क्षमता व वाईट प्रवृत्तीचा कल नसेल तर कोणी त्यास

## भडकाऊ शकणार नाही:-

सज्जनानों ! साधरणत लोक कोणा एका वर्गास अथवा व्यक्तीस समाज बिघडवण्याचे केंद्र बिन्दू समजतात आणि असे गृहित धरतात की या विकृत तत्त्वांनी किंवा व्यक्ति विशेषने संपूर्ण समाज जीवनास पथभ्रष्ट केले. पण मी या मताशी सहमत नाही. इतिहासाच्या अध्ययनाच्या आधारेमी ठामपणे सांगू शकतो की एक मासोळी तलावला गढूळ करू शकते पण एकमात्र व्यक्ति समाजाच्या बिघाडाचे कारण होऊच शकत नाही. खरे म्हटले तर सुसंस्कृत समाजात वाईट प्रवृत्तीच्या माणसास मुळीच स्थान नाही तो घुठमरला जाईल. जसे मासोळीस पाण्यावाहेर काढळ्याने ती मरते. त्याचप्रमाणे समाजात अपवृत्तीस थारा नाही अशा ठिकाणी वाईट माणसाचा दम गुदमरू लागतो, तो चरपुडतो व आपोआप मरण पावतो.

युगायुगात चांगली वाईट माणसे जन्माला आलीत परंतु सर्व वाईटासाठी त्यांना जबाबदार धरणे योग्य नव्हे. जरकाही


www.abulhasanalinadwi.org

वाईट लोक सत्ता गाजरीत असतील तरी त्याचा असा अर्थ नाही की संपूर्ण जीवनाची किल्लीच त्यांच्या हाती होते. आपल्या मर्जी प्रमाणे ते सर्वांच्या जीवनाला वळण देत होते. खरी गोष्ट अशी की त्याकाळी स्वत:समाजच बिघडला होता. त्या काळचा आत्मा मलीन झाला होता. त्यात वाईट प्रवृत्तीचा कल वाढला होता, त्यात अंधार, अत्याचार व वासने विषयीचे प्रावल्य होते. समाज स्वार्थी व आपलपोटा बनला होता. ज्या मनास कीड सागली, पापभावना वाढली त्यास आपण अपराधासपासून परावृत्त करूच शकत नाही. आपण त्याला बेड्या घालून बंदिस्त केले तरी आपण त्या गोष्टीपासून त्यास अलिप्त ठेऊच शकत नाही.

**स्वार्थी मनुष्य :-**

प्रत्येक युगात असे काही लोक होते की ज्यांची धारणा होती की आम्ही व आमचे नातेवाईकच परम मानव आहोत. आणि इतर सर्व मानव आमचे दास आहेत,काही असेदेखील मनुष्य आहेत की ते कोटयावधी मानवांना वास्तव्य करताना पाहतात पण ते स्वत: आपल्या विशिष्ट प्रकोटातील व्यक्तींनाच मनुष्य समजातात. त्यांची समज अशी की ते व त्यांच्या कुटुंबातील वीस पंचवीस लोकांनाच मानवजातीच्या नावाने संबोधण्याचा अधिकार आहे. अशी मानसे नेहमीच होती जी आपापल्या समस्या व आप्तेष्ठांना पाहण्यासाठी सक्षमदर्शकाचा वापर करतात आणि इतरांना पाहण्याकरीता त्यांचे डोळे मिटलेले असतात. काही जण दोन चष्मे



www.abulhasanalinadwi.org

वापरतात. एकाने स्वकियांना पाहतात नि दुसऱ्या चषम्याने साऱ्या जगाला पाहतात. त्यांना दिसतही नाही की मानव कुठे आहे? माझा अनुमान आहे की त्यांच्या जवळ जो चष्मा आहे त्याव्दारे त्यांना आपली लेकुरे आकाशाशी हितगुज करतांना दिसतात. त्यांना आपले रज पर्वत आणि दुसऱ्यांचे डोगंर रजकणासारखे दिसते.

## सुधाराविषयी काही सूचना व अनुभव

जगातील अनेक मानवांनी आपापल्या सममुद्रधी प्रमाणे उपाय योजिले आणि तशी अमंलबजावणी देखील केली.

कोणी म्हणाले, मानवास पोटभर जेवण मिळत नाही, हेच वाईटाचे मुख्य कारण आहे. हाच जीवनाचा महारोग आहे. त्यांनी या समस्येलाच आपल्या आयुष्याचे ध्येय बनविले. ज्या अर्थी पाप अधिक फोफावले. पूर्वी लोक दुर्बल होते. त्यामुळे पापदेरवील क्षीणच होते. त्यांना जेव्हां रक्त पुरविले गेले, जीवनशक्ति वाढली. परिणामत: त्यांचे पापही बलवान झाले. मन बदलले नाही. आत्मा बदलला नाही. बुद्धि बदलली नाही. शक्ति वाढली. निश्चिंतता आली फरक एवढाच की पूर्वी फाटक्या वस्त्रात पाप होत होते आता लखलखीत वस्त्रात पाप होऊ लागले. पूर्वी निर्बल आणि अकुशल हाताने पाप होत होते आत दणकट नि कुशल हातांनी तेच पाप होऊ लागले आहे.

कोणी असे म्हटले, चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. निरक्षरताच साऱ्या दु:खास कारणीभूत आहे. शिक्षण वाढले.


www.abulhasanalinadwi.org

लोकांनी ज्ञान मिळविले. विविध भाषांत प्राविण्य मिळविले. पण ज्यांचा आत्मा रोगीट, बुदधि वाकडी व मनात पाप भरले होते त्यांनी शिक्षणाचा वापर दंगे मागविण्यासाठी, समाजात उपद्रव माजविण्याचा एक हत्यार म्हणून केला. हे उघड की चोरास जर लोखंडाचे काम करता आले तर तो. सर्वप्रथम तिजोरी फोडण्याचे कार्यच शिकेल. आता जर कोणत्या मनात ईश्वराचे भय नाही व मानवाची सहानुभुति नाही. जुलूम तसेच अत्याचाराचे बालकूड त्यांच्या रोमरोमात भिनलेले असल्याने शिक्षण त्याच्या हातात विक्रत विनाशाचे हत्यार देईल नि त्यास पाप आणि चोरीचे नवनवीन कलूपल्या शिकवील.

काहींनी संघटन यास सुधाराचे साधन मानिले. त्यांनी सर्व शक्ति एकवटून मानवाचे संघटन उभारले. परिणामी बिगडलेल्यांची एक संस्था निर्माण झाली. जे कार्य पूर्वी असंघटीतपणे होत होते ते आता संघटितपणे होऊ लागले. आता कट रचून संघटितपणे चोऱ्या होऊ लागल्या. लोकांनीं नीतिची अनुभूती, मन व आत्मेची शुद्धीकडे लक्षकेंद्रित केले नाही. जशी भली बुरी माणसे होती त्यांना संघटीत करण्यालाच मोठे कार्य समजले, त्याचा परिणाम असा झाला की दुराचाराला नवशक्ति प्राप्त झाली. मी तर असे सांगेल की चोर, डाकू, दुराचारी यांचे जर संघटन नसे तरच बरे होते.

कोणी विचार मांडला, विविध भाषाच उपद्रवाचे मूळ



www.abulhasanalinadwi.org

कारण आहे. भाषा एकच असली पाहिजे. यानेच देशाची उन्नती व संपन्नता साधता येईल. मानवतेची सेवा घडून येईल. पणजर लोकांत बदल घडून आला नाही. विचार बदलले नाहीत मनातील आशा आकांक्षा बदलल्या नाहीत तर एकाच भाषेचा उपयोग तरी काय ? समजा, सारेजगातील चोर मि उपद्रवी एकच भाषा बोलू लागले तर याचा सर्व जगाला कोणता लाभ होणार आहे? याते काय चोऱ्या उपद्रव थांबेल ? मी तर असे समजतो की याने चोऱ्या, उपद्रव कमी होण्याऐवजी अधिक वाढीतल आणि गुन्हेगारास ओळखणे अधिक कठीण होईल.

कोणाच्या मते एकसंस्कृती हेच काळाची मोठी गरज नि मानवतेची महान सेवा आहे. पण काय आपणास माहीती नाही, येथे संस्कृतीची टक्कर होत नसते. हावरेपणाची झुंझ होते. माझ्यासारखा दुसरा कोणीच नाही ही घातक भावना झुंझाते. आमचे अनेक नेता विचार न करता म्हणू लागले की जर संपूर्ण जगाची संस्कृति एक झाली तर मानवतेची नाव नक्कीच तीराला लागेल. जर देशाची संस्कृती एक झाली, या देशातील निवासी एकजुटीने राहिले तर मित्रांने! संस्कृती एक असणे लाभदायी नाही. मन एक असणे लाभदायक आहे. एका कवीने खरे सांगितले की यक दिले अज यक जुबाने बेहतर अस्त. एक भाषी असण्यापेक्षा एकमन असणेच बरे. जे पुर्वीपासुनच एक भाषी आहेत व ज्यांची एकच संस्कृती आहे त्यांच्यात कोणते प्रेमभाव आढळून येते ? वा एकता



www.abulhasanalinadwi.org

दिसून येते ? ते काय एकमेकांवर अत्याचार करीत नाही ? काय ते एकमेकाशी दगल बाजी करीत नाहीत ? काय ते एकमेकाशी पीडीत निव्यथीत नाहीत ? एक संस्कृती, एक भाषावाले आपसात भांडतात की नाही ?

कोणी म्हणाले वस्त्र एक असावा पण जेव्हा कोणा शक्तिमतला कोटी धरण्याची सवय जडली असेल नि पाकिटमारीत सरावला असेल तर तो. वस्त्राचा काय आदर करणार ? काय तो पुचू यामुळे आपल्या विचारापासून थांबेल की त्यांच्या सारखाचा पेहरावा कोरा दुसऱ्याच्या अंगावर आहे. मानवतेचा आदर जर मनात नसेल तर वस्त्राचे आदर कसे निर्माण होऊ शकेल. वस्त्राचे मूल्य तर मानवामुळे आहे.

## मन बदलल्याशिवाय जीवन बदलत नाही :-

मित्रांनो ! मनुष्यतेच्या प्रश्नांचे समाधान समान भाषा वा समान वस्त्रात नाही. संस्कृतीची समानता नादेशाची एकता ना शिक्षण वा संपत्ती, ना संस्कृती व संघटन ना मोठी साधन सामुग्री यापैकी एकदेखील अशी शक्ति नाही जी या जयाज परिवर्तन घडवू शकेल. जो पर्यंत हृदयाचे जग बदलत नाही तो पर्यंत बाह्य जगात परिवर्तन होऊच शकत नाही. सगळ्या जगाचे सूत्र हृदयाच्या हाती आहे. जीवनाचे सारे बिघाड हृदयाच्या बिघाडापासून उदभवलेत. असे म्हटले जाते की डोक्याकडून मासोळी सडू लागते. मी असे म्हणतो की मानव हृदयाकडून सडतो. इथूनच बिघाडाला सुरूवात



www.abulhasanalinadwi.org

होते ति सारे जीवनावर तो व्यापून जातो.

## प्रेषित मानवतेची वृत्ती बदलू शकतो :-

प्रेषित येथूनच आपल्या कामाची सुरूवात करतात. त्यांना याची चांगलीच जाण असते की हे सारे हृदयदोषामुळेच आहे. मनुष्याचे मन बिघडले आहे. त्यात चोरी, अत्याचार, छळवणूक आणि हावरेपणा शिकोशीक भरला आहे. या मनात वासनेच्या सैतानाने धुमाकूळ माजवला आहे. तो. दरवेळी या मानवास नाचवतो आहे आणि तो. एका बालकाप्रमाणे त्याच्या इशाऱ्यावर नाचत आहे प्रेषित म्हणतात की साऱ्या बिघाडाचे मूळ असे की मानव पापी बनला आहे. म्हणून सर्वप्रथम त्याच्या हृदयाला स्वच्छ करावे.

भुकेने व्याकूळ मानवास पाहून प्रषिताचे मन कासावीस होऊ लागते. त्यांना खाणे-पिणे कठीण होऊन बसते. पण ते सत्यवादी असतात. याच एका घटनेला प्रश्न बनवून ते त्याच्या मागे लागत नाहीत. कारण त्यांना याची खरी जाणीव असते की हा बिघाडाचा परिणाम आहे. बिघाडाचे पालेमुळे कुठे आहेत. हे त्यांना माहीत आहे की जर लोकांना पोट भरण्याचे साधन करून दिले आणि क्षुधापीडितांना धान्य दिले गेले तर तत्कालीन प्रबंध होईल. ते असे वातावरण निर्माण करताल की लोकांकडून दुसऱ्यांची क्षुधा असह्य व्हावी आणि ते स्वत:आपल्या घरातील धान्य आणून लोकांना देतील.

या विपरीत लोक असे काही वातावरण निर्माण करतात



www.abulhasanalinadwi.org

की धान्य ऐकच ठिकाणी साठत राहावे. याद राखा ! जर ही विचारशैली बदलली नाही व धान्याचे वाटप वा निकासीचा प्रबंध केला गेला तर त्यानंतर देखील लोकांना ही कला अवगत आहे की इतरांच्या झोली तील दाणे आपल्या झोलीत कसे येतील. आणि संपत्ती हरदिशेने एकवटून त्यांच्या चरणात यावी. आपण अल्फलैलाची वाचलीच असेल की सिंदबाद जहाजी आपल्या एका सफरीत एका ठिकाणी पोचला. त्याने पाहिले की जहाजाचा कप्तान चिंतातूर नि दुःखी आहे. सिंदबादने त्याचे कारण विचारले. त्याने उत्तर दिले आम्ही चुकून अशा ठिकाणी आलोत की जवळच लोह चुंबकाचे एक पर्वत आहे. थोड्याच वेळात आमचा जहाज त्याजवळ पोचेल लोहचुंबक लोखंडास आपल्याकडे ओढतो. त्यामुळे जहाजातील सगळे खिळे व बिजागरे फळ्यांना सोडून पर्वतास जाऊन चिकटतील आणि जहाजाचे लहानमोठे भाग वेगवेगळे होतील त्यावेळी आमचा जहाज बुडाल्याशिवाय राहणार नाही. आणि मग घडले ही तसेच. लोह चुबांकाने लोखंडास ओढिले आणि जहाजात जितके लोखंड होते के पर्वतावर पोचले व जहाज बुडाले. सुदैवाने सिदंबाद एका तरंगल्या फळीच्या सहाय्याने एका बेटावर पोचल्यामुळे त्याचे प्राण वाचले.

ही गोष्ट खरी असो वा खोटी याशी माझे काही देणे घेणे नाही. पण मला आपणास ऐकवावयाचे होते की आमच्या समाजात लोहचुंबकासारखे धनिक व व्यापारी विद्यमान



www.abulhasanalinadwi.org

आहेत. ते असाकाही कटरचतात की सर्व संपत्ती त्यांच्या दारी येते. ते असे आर्थिक जाळे पसरवतात की लोक मर्जी असोनसो त्यांच्या झोळीत सगळेकाही टाकून देतात. आणि आपल्या अयुष्याची साधने नि गरजा त्यांच्या सुपुर्द करून परत गरिबी व उपासमारीचे जीवन जगू लागतात. प्रेषित ह्रदयाच्या स्वभावला संपूर्णत: बदलून टाकतो. तो माणसात असे काही बदल घडून आणतो की इतरांच्या क्षुधायातनाचे अवलोकन त्याने करूच नये. ते मानबात त्यागाची, बलीदानाची प्रबल भावना जागृत करतात खरी सहानुभूती जगवतात. त्यामुळे त्यास इतरांचे जीवन आपल्या स्वत:च्या जीवनापेक्षा प्रिय वाटू लागते. स्वत:च्या जीवाची तमा न करता इतरांच्या जीवाचे रक्षण करतो. तो आपल्या मुलाबाळांनी भुले ठेऊन दुसऱ्याचे पोट भरू इच्छितो. तो स्वत:च्या जिवावर जोखिम ओढून इतरांना जोखिमापासून सुरक्षित ठेऊ इच्छितो.

## त्यागाच्या दोन गोष्टी :-

आपण माझ्या या शब्दांनी आश्चार्य चकित होऊ नका. हे सर्व इतिहासातील किस्से आहेत. तुमच्या आमच्या याच दुनियेत असे घडले आहे. इतिहासात अशा घटनांची नोंद झाली आहे. ज्या त्या काल्पनीक गोष्टीपेक्षा किती तरी पटीने आश्चर्यजनक आहेत की ज्या आजच्या चित्रपटात वा पडद्यावर दाखविल्या जातात.

मोहम्मद रसूलुल्लाह सल्लल्लाहु अलै हि वसल्लमच्या या



www.abulhasanalinadwi.org

जगात आगमना नंतरच्या थोड्या काळा नंतरची ही गोष्ट आहे. एक मुसलमान आपल्या जखमी भावाच्या शोधात पाणी घेऊन निघाला. पाण्याची आवश्यकता भासल्यास मी त्याची सेवा करीन असे त्यास वाटले. जखमींच्या एका घोळक्यात त्याला आपला भाऊ सापडला. तो. जखमेने चूर नि तहानेने व्याकूळ झाला होता. त्याने पाण्याचा प्याला त्याच्या समोर आणताच जखमी भावाने एका दुसऱ्या जखमीकडे इशारा केला. जर ही गोष्ट इथेच संपली असती तरी ती मानवतेच्या उत्थानाकरिता पुरेशी होती व इतिहासात ती अमर राहिली असती. पण गोष्ट इथेच संपली नाही. दुसऱ्या समोर पाण्याचा प्याला आणला असता त्याने तिसऱ्या घायाळाकडे इशारा केला. प्रत्येक जण आपल्या शेजारच्या जखमीकडे इशारा करत राहिला. शेवटी प्याला जेव्हा फिरून पहिल्या घायाळा आला तेव्हा तो गतप्राण झाला होता. दुसऱ्या जवळ गेला,. तो. देखील मरणपावला होता. अशा तऱ्हेने एका मोगामाग सर्व घायाळ मरण पावले. परा इतिहासिक घटनेने आपला ठसा उमटवला. आजचे दृष्य असे की भाऊ भावाचा पोट कापतो आहे. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याच्या तोंडातून भाकरीचा तुकडा ओढताना दिसत आहे. अशा वातावरणात ही गोष्ट जण एक दी पस्तंभच आहे.

एकदा मोहम्मद रसुलुल्लाह सल्लल्लाहु अलै हि वसल्लम पाशी काही पाहुणे आले. आपल्या घरी खाण्याकरिता कोणतीच जिन्नस शिल्लक नव्हती. आपण म्हणाले यांना



www.abulhasanalinadwi.org

कोण आपल्या घरी नेण्यास तयार आहे? एक सहाबी हजरत अबूतल्हा अन्सारी पुढे सरसावले. त्यांनी पाहुण्यांना घरी नेले. घरी जेवण मोजकेच. घरच्या मंडळींनी ठरवले की मुलाबाळांना झोपी घातले जाईल. जेवण पाहुण्यांसमोर ठेऊन दीप विझवायचे.तसेच घडले पाहुणे पोटभर जेवले नि अबूतल्हा भुकेच उठले. पाहुण्याना कळाले देखील नाही की मेजवानाने जेवण केलेच नाही. ते फक्त रिते हात तोंडापर्यंत नेत होते.

## मानवतेचा वृक्ष आतून हरीत राहील :-

प्रेषित मानवात परिवर्तन करतात. ते संघटना बदलाचे प्रयत्न व करता मानववृत्ती बदलण्याचा प्रयत्न करतात. संघटन नेहमीच वृत्तीच्या आधीन राहिला आहे. जर हृदय बदलत नसेल, वृत्ती बदलत नसेल तर काहीच बदलणार नाही. लोक म्हणतात की जगच आहे. काळ वाईट आहे. मी असे सांगेन की काहीच नाही. मनुष्यच खराब आहे. काय पृथ्वीच्या स्थितीत फरक पडला ? काय वाऱ्याच्या परिणामात बदल घडला ? काय सुर्याने दाह नि प्रकाश देणे कमी केले ? काय आकाश बदलेले ? कोणाच्या वृत्तीत फरक घडून आला ? पृथ्वी पूर्वीप्रमाणेच स्वर्ण अर्पण करीत आहे. पूर्वीसारखेच तिच्या वक्षस्थानातून अन्नधान्य उपजत आहे. फळफळावळ भरपूर प्रमाणात निघत आहेत. पण वाटप करणारे पापी बनले आहेत. हे जुल्मी लोक आपल्या आवश्यक तांची यादी जेव्हा तयार करतात तेव्हा पाहिले



www.abulhasanalinadwi.org

तर असे दिसून येते की त्यांना वर्तमानपत्रातील अनेकपाने देखील कमी पडतात. दप्तर देखील कमी पडताना आढळतात. आणि ते जेव्हा इतरांच्या गरजांकडे व्यघतात तेव्हा सारे अर्थशशस्त्र खंगाळून त्य गरजांवर कात्री लावतात. जोपर्यंत अशी ही वृत्ती बदलत नाही तो पर्यंत मानवता हळहळतच राहणार. प्रेषित मनात इंजेक्शन लावतात. लोक फक्त बाहेरून डागडूज करतात व त्यावरच सर्व शक्ति पणाला लावतात. प्रेषित आंतल्या रोगाची काळजी वाहतात. आज सऱ्या जगात असेच चालले आहे. मानवतेचा वृक्ष आतून कोरडा होत चालला आहे. कीड त्याच्या आतीक मगुजाला खात आहे. परंतु विश्वज्ञानी बुक्रात वरवर पाण्याचा शिर्काव करण्याचा सल्ला ते आहे. वृक्षाच्या आत हरीतपणा व वाढण्याची शक्ति होती ती समाप्त होत चालली आहे. पण पाला हरीत ठेवण्याकरिता गॅसेस दिली जात आहेत. पाण्याचा शिर्काव केला जात आहे कोरडी पाने हिरवीगार व्हावीत या करिताच. प्रेषितांनी मानवास खरे मानव बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यास आस्थेचे इंजेक्शन दिले आणि म्हटले, ए! विसराळू मानवा ! आपल्या निर्मात्यास ओळख. निद्रास्थितीत चालता फिरता तो पाहता आहे हे तू मान्य कर, ना तो उघडतो ना झोपतो. لَا تَأْخُذُهُ سِنَةٌ وَّلَا نَوْمٌ

## मानवतेचे खरे प्रतिनिधी :-

मानवाच्य हृदयात जो पर्यंत प्रितीचे झरे फुटत नाही तो पर्यंत मनात त्याग नि बलिदानाची भावना उदभावणार नाही.



www.abulhasanalinadwi.org

मानवतेचे सुधार अशक्य आहे. प्रेषित मनुष्याची अशी काही काळजी वाहतात की त्याच्यात भावासाठी त्याग आणि दु:ख सोसाण्याची प्रबल भावना निर्माण होते. ते फक्त कायद्याव्दारे जगाचा इलाज करत नाहीत तर ते मानवात, खरी मानवता, मानवतेच्या सार निर्माणकरतात. असा वर्ग घडवतात. जोखऱ्या मानवतेच्या प्रात्यक्षिकाव्दारे हे सिद्ध करतो की आम्ही फेटाचे बुद्धीचे दास नाही. खुले आवाहान केले जाते की तो पोट, शौक, संपत्ती, राजेशाही वा नातेवाईका ओढ असणारा नाही. जोवर असा वर्ग समोर येत नाही मानवतेत सुधार होऊ शकत नाही.

जर कोणा देशात असा वर्ग उदभवतो जो सगळ्या करिता हितकारक ठरेल नि स्वत:ला विसरून तो मानवतेची सुधारण घडऊन आणू शकतो. इतिहासाची साक्ष आहे की मानवतेची मोठमोठे हितचिंतक होऊन गेलेल. पण कोणत्याना कोणत्या मंचावर आप दाखऊ शकताकी त्यांनी शेवटी आपला प्रबंध केलाच. अनेकानेक असे देशसेवक होऊन गेलेत की ज्यांनी देश सुधारणेचे काम अतिशय कठीण परिस्थित आरंभिले. कारावास केला, तुरूंग यात्रे नंतर सत्तेवर आले तो. त्यांचा हक्क होता त्या बद्दल अभिनंदन.

## प्रेषितांचे जीवन :-

पण ईश्वराचे प्रेषितांचे निषक्लंक होऊन जग सोडले.



www.abulhasanalinadwi.org

जगाच्या विलासाकरिता त्यांनी स्वत:चा ऐश-आराम त्यागला. शतप्रतिशत त्यांनी इतरांसाठी स्वत:खडतर जीवनाचा मार्ग स्वीकारला आणि एक प्रतिशत घेतला नाही. ते. आणि त्यांचे सहाबी व सहकारी जेथ जेथून गेले जगाला सुरवविले. विश्व आज पावे तो त्यांनी लावलेल्या उद्यानाची फले चाखत आहे. ज्यास त्यांनी आपले रक्त दिले होते. ज्यांनी इतरांच्या घरी दीप प्रज्वलित केले पण जग सोडून जाताना त्यांच्या घरात अंधारच होता. मोहम्द रसुलूल्लाह सल्लाहु अलै हि वसल्लमने दिलेल्या प्रकाशाने झोपडे व महाल सारखेच जगमगले. पण जग सोडून जातात त्यांच्या घरातील दिव्यात उसनवारीचे तेल होते. खरेतर मदीनाच्या शेकडो घरात त्यांनवी पेटवलेले दिवे प्रज्वलित होते. ते म्हणायचे

"نحن معشر الانبياء لانرث ولا نورث ما تركنا صدقة"

( आम्ही प्रेषित ना कोणाचे वारस असतो, ना आमच्या कोणी वारस असतो. आम्ही जे काही सोडूते सर्व गरीबांचा हक्क आहे.) त्याहूनी मोठे यांचे हे भाष्य, की ज्या कोणीने मेल्यावर जेकाही सोडले ते त्याच्या वारसाला धन्यवाद. आम्ही त्यातून एक दिडकी घेणार नाही. पण जर कोणाचे ऋण असेल तर ते माझ्या जिम्मे आह. ते मी देईन जगाच्या कोणा नेत्याने वा महाराजाने असे केले का ? त्यांचे जीवन मानवतेचा महत्तम नमूना होता. त्यांनी जगासमोर हे उदाहरण सादर केले ज्यात त्याग,प्रेम नि इतरांच्या वेदना स्वत:च्या



www.abulhasanalinadwi.org

जाणणे. त्यात स्वार्थ मुळीच नाही. ते अरबचे एकमेव बादशाह होते ज्यांची सत्ता हृदयावर होती. पण भौतिक वस्तूंना स्पर्शदेखील केला नाही. तेच नव्हे. जो त्यांच्या जितक्या जवळ होता तो. वित्काच धोक्याच्या जवळ होता व लाभापासून दूर होता. आपल्या बायकांना उघडपणे सांगितले की विश्वातील ऐशाराम जर हवे असेल तर मी तुम्हास भलेभलते देऊन तुमच्या घरी पाठवून देतो. तुम्ही परत जा व ऐशआरामचे जीवन जगा नि माझ्या कडून फारखात घ्या. माझ्या बरोबर राहायचे असेल तर वंदना दु:ख गरिबीशी झुंझणे, हैंच या घराची भेट वस्तू आहे नि यावरुच अल्लाहच्या घरी इनाम मिळेल.

मित्रांनो ! आमची इच्छा आहे की परत हे जीवन सर्वांना लाभो. मानवतेची निर्भेळ सेवा नि नि:स्वार्थ प्रेम नांदावा, मग दुसऱ्यांच्या फायद्यासाठी स्वत: तोटा सोसण्याची मानसिकता दिवावी. मग असे लोक उदयास यावेत जे धोक्याच्या वेळी मदतीसाठी पुढाकर घेणारे व लाभाच्या वेळी दूर दूर दिसावेत.

## आकांक्षातृप्ति शांतीचा मार्ग नव्हे :-

आज जगातील सगळी राष्ट्रे नि सरकारे वर्गा वर्गांना संतुष्ट करण्यासाठी आटोकात प्रयत्नशील आहेत. पण हे पाश्चात्या विचारवंतांनो! हा सुधारणा व तृप्तिचा मार्ग नव्हे. येथे एका व्यक्तिच्या आकांक्षा पुऱ्या होणे कठीण आहे. आकांक्षा असंख्य निजग सीमित संक्षिप्त . तसेच कोट्यावधि



www.abulhasanalinadwi.org

लोकांसाठी एकच. वास्तविक पाहता या जगात एका व्यक्तिच्या आशा आकांक्षा पुऱ्या करणेदेखील अशकय येथे कोणा हावऱ्या माणसाची इच्छा पूर्ति होऊत शकत नाही.

आज जगातील दिग्गज नेते म्हणतात की मानवाच्या सर्व आशाआकांक्षा उचित व स्वाभाविक आहेत. त्या पूर्ण व्हाव्यात आणि याकरिता सारे जग प्रयत्नशील आहे.

मित्रांनो ! हीच मूलभूत चूक आहे. आकांक्षांची तृतिव पुर्तते मुळे मानवतेचे समाधाम होऊन शकत नाही. आकांक्षा तृप्तिने आकांक्षेत घट व मन शांति प्राप्त होणार नाही. हे तर समुद्राचे खारट पाणी आहे. जितका प्याल तितकी तहान वाढेल. आज साऱ्या जगातील देश, संस्था, संस्कृत्या याच सूत्रानुसार कार्यरत आहेत की मानवाच्या खऱ्याखोट्या आकांक्षा पुर्तिचो साधन सामग्री गोळा करावी. वर्ग, समाज, देश नी लोक जे मागतील त्यांना दिले जावे. त्यामुळे शांति प्रस्थपित होईल. तृप्ति मिळेल. पण याचे परिणाम अगदी उलट आहेत. आज सगळीकडे आग लागली आहे. मनातीक अग्नि कोणानेच शमत नाही. इच्छांचा आलाव पेटतच आहे. यात प्रत्येक वर्ग आहुती टाकत आहे. त्यास अधिक पेखत आहे, आज याची धवा आकाशाला जाऊन भिडाली आहे. त्यांच्या ज्वाला अनेक देशात पोचले आहे. وقودها الناس والحجارة (त्याचे जळण मनुष्य आणि दगड आहेत) चे दृष्य दिसत आहे. लोक या अग्निची तक्रार करतांहेत पण विचार



www.abulhasanalinadwi.org

करण्याजोगी गोष्ट ही की ही अग्नि कोणी पेटवाली? ही शेकोटी कोणी प्रज्वलित केली ? यावर तेल कोणी ओतले ? यात जळण कोण टाकत आहे ? आकांक्षापूर्ति नितृप्तिच्या वाटेचे हेच फलित नि मजल आहे. नवल असे हेच लोक जे देशवासियांची प्रत्येक आकांक्षा आणि प्रत्येक मागणी मान्य करणे आवश्यक समजतात आणि त्यासाठी मनोरंजन व तृप्तिची साधनसग्रीची पूर्तता आवश्यक समजतात, आपल्या मुलांबाळासोबत असे व्यवहार करण्यास कचरतात. त्यांच्या घातक आकांक्षांवर बंधने घालतात. बाळ जर अग्निशी खेळू इच्छित असेल तर त्यास खेळू देत नाही. पण ते जनतेच्या प्रत्येक आकांक्षा व मागणी पूर्ण कण्यासा तयार आहेत. जे काही त्यांना करावेसे वाटे. याचा अर्थ असा की त्यांना आपल्या जनतेशी आपल्या पोटच्या मुलांबाळाप्रमाणे सहानुभुती नाही. हेच लोक जे देशावर राज्य करतात त्यांना आनंदीत ठेवण्याकरिता आणि मते मिळविण्यासाठी प्रत्येक वाजवी गैर वाजवी इच्छापूर्ती आवश्यक समजतात. आज कोणत्याही देशात कोणताच असा पक्ष नाही कोणत्याही मनुष्यात नैतिक धाडस नाही की त्याने मनोरंजन व विलास भोगावर टीका करावी, ऐश आरामाचा वाढता शौक, सिनेमा पाहणे, नाचणे, चित्रीकरणाच्या अपार इच्छे नि व्यसना वर आक्षेप कोण घेणार ? आज अशी सरकार अस्तित्वात नाही जी या गोष्टीवंर प्रतिबंध लावेल व जनतेची ब देशवासियांची नाराजी ओढून घेईल.



www.abulhasanalinadwi.org

## अल्लाहचे प्रेषित उतकांक्षांना संतुलित करतात:-

अल्लाहच्या प्रेषितांचे मार्ग अगदी यांचे उल आहे. उचित अनुचित आकांक्षा पूर्ति व तृप्ती ऐकजी त्यांनी आकांक्षांना लगाम लावली. त्यांनी आकंक्षांची दिशा बदलली. फक्त उचित आकांक्षांनाच योग्य ठरऊन त्यांच्या पूर्तिची व्यवस्था केली. त्यांनी जीवित नि जागृत आत्मा निर्माण केला. त्यामुळे जीवनात संतुलन आणि मनात शांततानांद लागली. तुमच्या शाळेले, तुमच्या प्रयोग शाळेते, तुमच्या विज्ञानाने जगास फारकाही दिले. त्यांनी आश्चर्यकारक विष्कारांना जन्म दिला. पण माणसाला पवित्र आत्मा दिला नाही. तुमच्या या संस्थांनी मानवाचे हाम मोकळे केले, बाळांच्या हाती हत्यार तर दिले पण प्रशिक्षण दिले नाही. आज ती नादान बालके चंचलतेचे प्रदर्शन करीत आहेत मनाप्रमाणे त्या हत्यारांचा वापर करीत आहेत. पण अल्लाहच्या प्रेषितांनी आकांक्षेवर पहारे बसवले आकांक्षा संतुलित केल्या. विषय वासनाऐवजी अल्लाहला राजी करण्याची प्रबल इच्छाशक्ति जागृत केली. मानवी सहानुभूति संवेदन शीलता निर्माण केली. त्यांनी वस्तूंचा अविष्कार केला नाही. पण अशी विचार शक्ति निर्माण केली की जीने परमेश्वर निर्मित आणि मानव निर्मित वस्तू रापरण्याची क्षमता उत्पन्न व्हावी. त्यांनी आत्मा दिला आज या संसाराजवळ सगळे काही आहे पण निष्ठा नाही. आज या विश्वाचे कारखाने सर्वकाही निर्माण करू शकतात पण निष्ठा प्रेषितांच्या कारखान्यातच मिळते. आज जग



www.abulhasanalinadwi.org

ईश्वराचे भय बाळगणाऱ्या पासून रिती आहे. निष्ठेपासून रिती आहे. मानवतेच्या नि:स्वार्थ संवेपासून रिती आहे. नि:स्वार्थ सेवा कोण करणार ? ईश्वांराचा भय व त्याची मर्जीवर निष्ठा, त्याच्या परिवाराची सेवेची प्रेरणा देतो. मानवतेचे हे सेवक कोणत्याही नाऱ्यापासून दूर सत्रालालसे पासून अलिप्त, चाणक्य नीती व राजनैतिक जोडतोडी पासून बेजार, मनापासून सेवा करतात. आज आशाप कार्यकरत्यांची गरज आहे ज्यांच्याजवळ काहीच नाही. तरी काही घेण्यासाठी ते निरच्छुकच आहेत. या उलट काही ना काही देण्याचीच त्यांची इच्छा आहे.

## आमचा संदेश :-

आम्ही जनसामान्यात हीच प्रेरणा निर्माण करण्याची इच्छा बाळगतो. त्यांच्यात सत्याची तहान वाढीस लावण्याचे इच्छुक आहोत. जीवन फक्त खाण्यापिण्याचे नाव नव्हे. मनुष्याचे जीवन फक्त भौतिक वा पाशवी जीवन जगण्याचे नाव नव्हे. आम्ही एक नवप्रेरणा घेऊन आलोत. आजच्या जगात ही नवीनच गोष्ट आहे. खरेतर ही नवी नाही. जगातीप्रत्येक प्रेषित जे आपापल्या लोकात अवतीर्ण झाले त्यांनी हाच संदेश दिला. सर्वांपेक्षा जास्त नेटाने व शक्तीने मोहम्मद रसूलुल्लाह सललललाहु अलै हि वसल्लमने सर्व प्रेषितांच्या शेवटी ही गोष्ट सांगितली. सत्य कथा चौकाचौकात बोलण्या लायक आहे. लोक पोटाभोवती भ्रमण करीत आहेत. खरे जीवन मृतावस्थेला पोचले आहे. मानवतेची संपत्ति



www.abulhasanalinadwi.org

लुटली जात आहे. मी एक आवाहन करण्यासाठी आलो आहे. सत्याचे आवाहन. जग या आवाहनापासून अपरिचित आहे. पण मी या जगापासून निराश नाही. मनुष्यांजवळ अजूनही आत्मा आहे. हा आत्मा मृत नाही. त्यावर फुफाट्याचे थर जमले आहेत. जर फुफाटा काढून टाकला व त्यावरील मळ स्वच्छ केल्यास याची नक्कीच शक्यता आहे की ते सत्याचा अंगीकार करेल व त्याच निष्ठेची नवचेतना जागृत होईल.





www.abulhasanalinadwi.org

# आज जगभर स्वार्थ आणि अश्लीलतेचे वारे वाहत आहेत

जोनपूरच्या टाऊन हॉल मध्ये दिनांक १५ जानेवारी १९५४ रोजी दिलेले एक भाषण यात सुशिक्षित, सुज्ञ तसेच इतर धर्माची निवडक मंडळी हजर होती. आणि राजकीय व संस्था चालक देखील उपस्थित होते.



www.abulhasanalinadwi.org

## विचित्र सभा :-

मित्रांनो व बंधूनो! जगाची एकरूढी आहे. जणूती एक घट्ट रेषाच बनली आहे. तिलासोडून जर कोणी बोलले किंवा वागले तर नवलसे वाटते. मी या जगजाहीर रीति विरूध्द आपल्या शहरात येऊन सर्वसामान्य रूढी विरूध्द ही सभा घेत आहे. या सभेचा ना कोणी अध्यक्ष ना कोणते अनुमोदन. तसे पाहिले तर माझ्या परिचयार्थ जे भाषण झाले तेदेखील आपल्या रीतिप्रमाणे नव्हते. माझ्या प्रिय मित्राने अतिशयोक्ति केली. माझ्या समोर माझी स्तुतिबरी वाटण्या जोगे मुळीच नाही. तसेच ते माझ्यावर प्रेम करतात हे मला मान्य आहे. मी आपल्या सेवेत उपस्थित झालो. माझ्याबरोबर माझे सत्तर ऐंशी सहकारी देखील येथे उपस्थित आहेत. आम्ही कोणता कमाल करून दाखवला नाही. स्वत: आमच्या या देशात व देशाबाहेर देखील लोकांनी तन,मन, धनाने मानवतेची सेवा केली आहे. मानवतेवर ज्या ज्या लोकांनी उपकार केलेत, त्यांनी केलेल्या सेवा कार्यांचा जेव्हा मी आढावा घेतो. तेव्हा मला आपली लाजवाटते. त्यांनी अज्ञातवासात राहून कोणतीही संस्था वा कमेटी न काढता मानवतेची भक्कम सेवा केली. देव भला करे पश्चिमी राष्ट्रांचा की आता संस्था, कमेटी, अध्यक्ष नि ओळख करून दिल्या विना कळतच नाही की कसले कार्य केले जाऊ शकते. मी काय केले ? अल्लाहच्या कृपेमुळे मी येथे आलो नि त्याच्या कृपेनेच मी



www.abulhasanalinadwi.org

बोलत आहे. मला अगदी मोकळ्यापणे आपल्याशी बोलाबेसे वाटते. माझ्या नि आपल्या दरम्या हा जो मायक्रोफोन आहे, तोदेखील नकोसा वाटतो. आम्हा दोघांना समजून घेण्याकरिता त्याचा उपकार कशाला हवा. पण मजबूरी आहे. मी व्यासपीठावर बसलो आहे या करिता की आपल्या बंधूंना पाहावे म्हणून आणी एखी मी यावेळी जे सांगीन घरासारखी निखळ संवाद साधल्यासारखे होईल आपण तसेच समजा आवाज बिघडला आहे.

मित्रांनो ! मला आपल्याशी ज्या समस्ये विषयी बोलायचे आहे. ती आमची, आपली समान समस्या आहे. समस्या अनेक आहेत. एक एका समस्येवर वेगवेगळ्यापणे विचार केल्यास फार वेळ खर्ची पडेल आणि गोष्ट फार दूरपर्यंत जाईल.ही जीवनातील अतिशय दु:खाद्रयी घटना आहे की येथे (सर्वाकडे वातावरण आवाचा आवाज) बिघटले आहे. या बिघडण्याचे मूळ कारण जाणण्यासाठीच त्यावर हात ठेवायचे आहे. आपणास नगर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाची चांगलीच कल्पना असेल. जरनळातून गढूळ पाणी येऊ लागले, तट त्यांत रोगजंतू असतील, त्याचा पोटावर वाईट परिणाम होत असेल, तर त्यावर उपाय म्हणून एक मार्ग हा की प्रत्येकाने आपापल्या घरातील नळाच्या तोंडावर कपडा बांधावा पाणी गाळून किंवा उभळून प्यावे. पण शहाणपणा हा की पाणी पुरवठा विभागास स्वच्छ व दुरूस्त करण्याची काळजी घ्यावी. शहर प्रशासकास



www.abulhasanalinadwi.org

अर्जकरावा.आम्ही जर कपडा बांधून पाणी गाळून प्यालो तर बहुतेक अनभिज्ञ तहानलेले असतात. सहजपणे पिऊ लागतात त्यांच्या सुरक्षिततेचा मार्ग कोणता ? आपण स्वत:च विचार करा की त्यातला कोणता मार्ग योग्य आहे.

आज मानवतेच्या पाणी पुरवठा विभागात बिघाड झाला आहे. जेथून जीवनाचा झरा उगम पावतो त्या मुद्यावर बिघाड आहे. जीवनरूपी विद्युतघरानां दुरूस्त झाले. जेथून साऱ्या गावाला विद्युत पुरवठा होतो. मानवता तिळतिळ वितळत चालली आहे. चोरी, घुसखोरी, धोकेबाजीचा सुळसुळाट आहे. वर्तमान मानव उपरोक्त डबक्यांतून सरास चिंब झाला आहे. वर्तमानकालीन विचारवंत या निकालावर उदीग्र आहेत. पण राग कोणावर काढावा ? आणि कोणास जबाबदार धरावे ?

## खरा गुन्हेगार कोण ?

तुम्ही तर मानव आहात. पशुंना देखील हे सत्य माहीत आहे की त्यांचा शत्रू कोण आहे? कुत्रा देखील मारणाऱ्याच्या हाताच्या दिशेने धाव घेतो. दगडाशी त्याला काही देणे घेणे नसतं गाढवाची मुर्खता तर सगळ्यांच्याच परिचयाची आहे. त्याला दगड मारून पहा. तो. मारणाऱ्याच्या विरूध्द दिशेने रागारागाने धाऊ लागतो. समजतो की आपल्यावर संकट कोठून आली. आम्ही, तुम्ही या जनावरांपासून देखील फार मागासलेलो आहोत. काचेच्या महालात राहतो. चोहू बाजूने दगडांचा वर्षाव होतो आहे. एक हात आहे. तो. सतत वर्षाव



www.abulhasanalinadwi.org

करतो आहे. आम्हास तो हात दिसत नाही. दगडा वर आपला राग उतरवतो आहोत. तो हात अगदी संतुष्ट आहे की नजरे आड आहे. आणि मनसोक्त पणे दगडफेक करीत आहे. मोठमोठे लालभुझप्रवृत्तीचे दगडफेकीत सामिल आहेत. मानवतेच्या सुधाराबाबत आम विचारावंतांची हीच स्थिती आहे. प्रत्येकाचा विचारकरण्याचा अंदाज वेगळाच असतो.

**प्रेषितांच्या विचारा चीं पद्धतीः-**

मी जे काही विचार करतो ते प्रेषितांच्या पध्दतीला अनुसरूनच आहे. मी पूर्णत चिंतन मनन करून अनेक अनुभव घेऊन अगदी संतुष्ट या निर्णयावर पोचलो की प्रेषित, मृतावस्थेस पोचलेल्या मानवतेच्या समस्या ज्या पध्दतीने निकाली लावतात तीच पध्दत बरोबर आहे. जेव्हा याच अंदाजे पायाभूत काम झाले. मानवतेच्या काळीजातील खुपलेल्या सुया बाहेर निघाल्या. होळ्यातील सुया आपोआप बाहेर आल्या.असा प्रेमभावाचा काळ आला की सगळीकडे शांती व समाधान पसरले. पवित्र कुरान म्हणतो की प्रत्येक जातीत व देशात परमेश्वराच्या मार्ग दाखवणारे आलेत. त्यांच्या शिकवणीवर कालांतराने धूळ पडली. काही प्रमाणात आम्हाला सुशिक्षित असल्याबद्दल अभिमान वाटू लागला. आम्ही शिकलो सवरलो म्हणून आम्हास दोन हजार वर्षांपूर्वीची कार्यपद्धती काळबाह्य वाटू लागली. आणि त्या पद्धतीचा विचार करणे आम्हांस लाजिर्वाणे वाटू लागले. पण खरे तर हे, की सुर्य सर्वात प्राचीन आहे. नवीन तेज धारक



www.abulhasanalinadwi.org

जुन्या सूर्यापासून आपली डोळे झाक करू शक्त नाही. आम्ही प्रेषितांची पध्दती अवलंबिली आहे. आम्ही मानवतेच्या सुधाराविषयी त्यांचीच शिकवण घेतली.

## स्वार्थ व अश्लीलतेचे मानसून :-

प्रेषित म्हणतात की प्रत्येक वस्तूचे एकसार असते. जर ती वस्तू बंद करावीशी वाटत असेल, आणि तिच्या परिणामापासून बचाव करावासा वाटत असेल तर प्रयत्न असा करावा लागेल की सारच उत्पन्न होऊ नये. आपणास एक साधारण उदाहरण देतो. उन्हाळ्यात समुद्रात वाफीकरण होते. बाष्प उठते. उष्णतेमुळे ते वितळते. डोंगराला भिडते. आणि मुसळधार पावासाच्या रूपाने वर्षावतात. आम्ही मानसूनी पावसाला शामियाना वा चादरीच्या माध्यामाने रोखू शकत नाही.आज जगावर अश्लीलतेचे ढग दाटून आले भांडवल आहेत. हा वादाचा मानसून आहे. हा स्वार्थाचा मानसून आहे. दुराचास नि वासनाविलासाचा मानसून आहे. हृदयरूपी सागरातून स्वार्थाची काष्प, भोग विलासाची इच्छा जेव्हा आपल्या सीमा ओलांडतील विलासाची उष्णता त्यास वितळवील मग स्वार्थाच्या मानसूनाचा वर्षाव होईल. तो चादरींनी रोखता येणार नाही.

## त्याचा उपाय :-

हृदयाच्या मानसूनला रोखण्याकरिता परमेश्वरावर आस्था मेल्यावर कर्मकांडाचे हिशेष दिला जाण्यावर विश्वास, त्यानुसार फळ प्राप्तीवर विश्वास असणे आवश्यक आहे. एक



www.abulhasanalinadwi.org

असा व्यक्ति जो या पायाभुत गोष्टींवर विश्वास ठेवत नाही. आपल्या जन्मदात्यास, रोजगार देणाऱ्यामालक व अन्नदात्यास ओळखत नाही. तो. जगावर सत्ता प्राप्त करून त्याचा लाभ का उठवू नये. त्याने निर्बलांचा विचार का करावा? त्यास याची कल्पना आहे की त्यास एक संधी मिळाली आहे. तो म्हणतो जीवनाचा भरपूर लाभ उठवा. जे कोणत्या ना कोणत्या चलाखीने वर आलेत ते का म्हणून दुसऱ्याचे वर्चस्व स्वीकार करतील, का म्हणून कोण्याच्या कायद्याचा आदर करतील? नि आजच्या मौज मजेस उद्याच्यावर का टाकतील. जर मलादेखील कळाले की मरणो परांत जीवन नाही आणि फक्त इथलेच जीवन आहे. तर मग आजचे विलासी जीवन कोणत्या दिवसाकरिता उचलून ठेऊ. अरब एक नवयुवक कवी फार जिगरबाज होता. तो म्हणतो दोन कबरींचे ढिगार समान आहेत. चांगला तो की ज्याने भरपूर विलासी जीवन जगला. वाईट व कम नशीबी तो की जो कष्टनि हाल अपेष्टा सहन करीत राहिला.मेल्यानंतर जर दोघांना खाक (नष्ट) व्हायचेच नि दोघांना एकच फळ मिळणार असेल तर मग मी का म्हणून आपल्या आकांक्षापूर्तिपासून वंचित राहू. आणि कशासाठी त्याग करू.अधिकाधिक मौजमजा करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे.

मित्रांनो! एक प्राचीन कवी नास्तिक होता. मरणोपरांत हिशेब द्यावा लागणार त्याचा त्यावर विश्वास नव्हता. आज आपल्या या उन्नत युगाचा जीवनाचादेखील हाच तत्वज्ञान



www.abulhasanalinadwi.org

आहे. आजचे तत्वज्ञान नि शिक्षणपण हेच की खा, प्या, मौज करा. जर हेच जीवनाचे ध्येय ठरले तर अशाच प्रकारची पीढी तयार हाईल जे आम्ही पाहत आहोत.

## वर्तमानस्थिती नैसर्गिक व आमच्या वैचारिक प्रशिक्षणाचा परिणाम आहे

प्रेषित म्हणतात, ज्याकोणात विश्वास भावना नाही त्यात आकांक्षांचा जो डोम उसळेल त्याचा आवश्य वर्षाव होईल. आज साऱ्या जगात आकांक्षाचे मानसूनी ढग दाटून येत आहेत. जगातील लोकदेखील किती विचित्र, समुद्राकडून वादळ उठले गप्प राहिले, भारताकडे आलेत गप्प राहिले, हिमालयास भिडले तरी चुपच आणि आता जेव्हा भिडून वर्षा झाली तर कपडे भिजल्याची तक्रार केली जात आहे. आता सारी दुनियेचे ठेकेदार अमेरिका, रशिया नि युरोप सर्व एकच बोली बोलताहेत. मनातील बाष्पेचे पोषण करतात. आणि जेव्हा आकांक्षाचे मानसून कोसळू लागले तेव्हा ते त्यावर रागावतात. भोग विलासाच्या जलकुंभाला भरत राहिले, आयुष्यभर आकांक्षांना प्रशिक्षण तुम्ही देत राहिलात. तेच शिक्षण देत राहिलात. तुम्ही त्याचाच मानपान करीत राहिलात जो तुमच्यापेक्षा जास्त धनिक होता. जो जितका जास्त श्रीमंत तो तितका सौभाग्यशाली. हाच तुमचा आदर्श. तुम्ही अशा माणसाचाच आदर करता. तुम्ही सतत धनदौलतीची प्रशंसा करीत राहिलात तुमच्यापाशी मान्यवर होण्याची कसोटी पैसा आहे. काही काळापूर्वी मी एका



www.abulhasanalinadwi.org

गृहस्थाची भेट घेण्याकरिता गेलो असता तो माझ्याशी अगदी दुर्लक्षतेने वागत होता. त्याचक्षणी एक व्यक्ती आले. त्यांना मी ओळखत नव्हतो. ते अगदी अदबीने उभे राहिले. आणि जितका वेळ ते तिथे राहिले तो हात जोडून बोलत राहिला. ते गेल्यानंतर तो म्हणाला, हे बत्तीस रूपये फी वाले डॉक्टर साहेब आहेत. शेख सादींनी आल्या एका प्रसगांचे वर्णन लिहीले की ते एका निमंत्राणात मामूली कपडे घालून गेले. कोणी त्यांना मुळीच बोलेना. दुसऱ्या वेळी ते उद्यकपडे घालून त्या ठिकाणी पोचले. भोजन पाटावर आदराने त्यांना बसवण्यात आले ते आपल्या वस्त्रावर खायच्या वस्तू टाकू लागले. त्यांना विचारण्यात आले की आपण असे काय करता? त्यांनी उत्तर दिले निमंत्रण तर या कपडयांचे आहे. त्यांमुळेच मी येथे खात आहे. म्हणून तर या वस्त्रांचा आदर सम्मान करतो आहे. मी यापूर्वी मळकट वस्त्रात मी आलो होतो.

आज साऱ्या जगात हेच घडते आहे. आपण आपल्या मुळास हे कधी दाखविले की खरे सौजन्य गुणवान व शीलवान होणे हे आहे. जेव्हापासून तो शहाणा झाला त्याने हेच पाहिले की जो मोटारीवर आला त्यालाच सन्मान मिळाला. आणि जो तांग्यात जाला त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्याने जर सौजन्याचे मापदंड नैतिकतेला सोडून धन दौलतीस समजला तर काय अनर्थ झाले.

या उलट अल्लाहचे प्रेषित, अल्लाहचे भययांस



www.abulhasanalinadwi.org

शीलवानतेचा आदर्श मानतात. एकदा अरबचे नामी सरदार हजरत उमरच्या भेटीसाठी आले. त्यांना प्रतिक्षा करण्यास सांगितण्यात आले. इतक्यात गरीब हबशी मुअज्जन (अजान म्हणणारे) हजरत बिलाल आले त्यांना लगेच आत बोलावण्यात आले. मदीनाचे आणखी एक गरीब माणूस आले. त्यांनादेखील आंत बोलावण्यात आले. आणि ते आपापले काम पूर्णकरून परतले. जणू आगोदरच हे ठरले होते. अरबसरदार राजेशाही दिमाखाचे होते. त्यांनी या वागणुकीचे वाईट वाटले. ते बोलले, वाह रे भगवान, आमच्या समोर या दीन दुबळ्यांना बोलावण्यात येते नि आम्हास तातकाळ ठेवता विचित्रच नाही. त्यांच्यातील एक समजूतदार म्हणाला, उमर (रजियल्लाहु अन्हु) काट्यात मोजमाप करून व्यवहार करतात. त्यात ना त्या गरीबांचा कसूर ना उमरचा सर्वांना अल्लाहच्या नावाचे बोलावले गेले होते. हे पुढे गेले तुम्ही बसून राहिलात. तुम्ही अल्लाहच्या कार्याची कदर केली नाही. ते आज उमरच्या दरबारात जास्त उद्यापदावर आहेत. उद्या अल्लाहच्या दरबारी तुम्हापेक्षा आगोदर विचारले जातील.

## युद्धासाठी जबाबदार कोण ?

सध्याच्या जीवन पध्दतीत मानवतेची श्रेष्ठता पैसा आणि भौतिक उन्नतीने मापली जाते. आमचे साहित्य, आमची कला, सर्व हेच शिकवण देतात की ज्याच्या जवळ भौतिक साधन सामग्री जास्त असेल व ज्यापाशी जास्त पैसा असेल



www.abulhasanalinadwi.org

तोच जास्त सभ्यगृहस्थ. धनिकच मानव आहे. गरीब मानव नव्हे. आज साऱ्या संसारात हीच विचारसरणी व हेच जीवनाचे आदर्श ठरले आहे. याचा परिणाम असा की प्रत्येक व्यक्ति लवकरात लवकर धनवान बनण्याची इच्छा बाळगू लागला आहे. त्यासाठी तो योग्य-अयोग्य सर्व प्रकारचे मार्ग अवलंबितो. हे यासाठी की तो हे जाणून आहे की पैशामुळेच पत आहे.

गेली दोन महांयुद्धे धनदौलत निमान मर्यादाच्या परिणामस्वरूप होती. एका प्रवासात आगगाडीतच माझा परिचय एका हिन्दु मित्राशी कण्यात आला. लगेचच ते म्हणाले, जगातील सगळे दंगे मौल्वी आणि पंडीतांमुळेच आहेत. जणू त्यांचा हाव्यवसायच आहे. मी उत्तरलो, होय. पहिले व दुसरे महायुद्ध मौलवी व पंडीतांनीच भडकवले होते. त्यावरते गप्प राहिले. मी आपणास विचारतो की साऱ्या जगाचारक्त पिणारे नि रक्ताची होळी खेळणारे, ईस्त्राईली गुणधारक कारखनादार होते . सन १९१४ ई. च्या युध्दात इस्त्राईली कारखानदारांचा हात होता) शस्त्रास्त्रांचे मोठमोठे कारखाने होते त्यांचे. हे विकण्याकरिता त्यांना मोठी बाजार पेठे हवी होती. एक योजना आखून त्यांनी कटस्वला. घातपात घडवला, विविध राष्ट्रांना एकमेकांसमोर युद्धभूमीत उतरवले. एक का रखाना चालवण्यासाठी त्यांनी इतका मोठा दंगा माजवलाकी ज्यात लाखो लोक मृत्यूमुखी पडले. आणि अनेक देश नेस्तनाबूद झालेत. आज देशादेशात युद्ध



www.abulhasanalinadwi.org

माजवण्या मागची भावना हीच की आमची तिजोरी भरली पाहिजे. आमचा गवगवा असावा. आमचा शिक्का चालावा. आमच्या देशाचा बोलबाला व्हावा. हे मोठ्या प्रमाणातील स्वार्थ भावनातच साऱ्या दंग्याचे मूळ सामावले आहे. संस्कृति, भाषा वेगळी असणे दंग्यास कारणीभूत नाही. मी विचारतो की एकच संस्कृतिनी एकाच भाषी लोकात आपसात भांडले नाहीत का ? आमच्या देशात कौरव, पांडव भांडलेत. ते एका कुटुंबातील होते. अरब मध्ये कबीला कबील्यात युद्ध झाले. ज्यांची भाषा निसंसक्रती एकच होती.अफगानिस्थनात पठाण पठाणात, पाकिस्तानात मुसलमान मुसलमानशी आणि हिन्दुस्थानात हिंदु हिदुं मध्ये भांडणे होतात. या भांडणाच्या मुळात स्वार्थ दडलेला आहे. स्वार्थ झुंझत आहेत.

## आंतील लावा बाहेर निघत आहे :-

पैगंबराची कार्यपध्दती अशी की हृदयातील दोष दूर व्हावेत. बाहेर जो बिघाड आहे तो आंतून निघत आहे. आतील लावा बाहेर निघाल आहे. आमची समज अशी की बाहेरचे दोष आंत शिरले आहेत. म्हणून बाहेरच्या डागडूजीच्या कामात लागलो. जसे सर्व शरीरावर हृदयावरील रोगाचा परिणाम होतो. तसेच संपूर्ण जीवन व्यवस्थेवर इच्छादोष व दूषित विचार सरणीचा प्रभाव पडत असतो. जुन्या कथेत येते की एक राजा शिकारीला गेला असता आपल्या साथीदारांपासून वेगळा पडला. त्याला रात्री



www.abulhasanalinadwi.org

एका वृध्देच्या झोपडीत राहावे लागले. वृध्देने दूध दोहिले तर शेरा निघाले. हे पाहून कर लावण्याचा विचार राजाच्या मनात आला. दुसऱ्या वेळी बकरीचे दूध घटले. बादशाह तेथेच बसला होता. वृदधात्यास ओळखत नव्हती वृदधा दु:खित मुद्रेने उदगारली. आजबकरीचे दूध आटले. असेवाटते की राजाच्या मनात पाप आले आहे.

मनुष्य या जगाचा राजा आहे. त्याच्या मनात पाप शिरले. त्याचे हृदय बिघडल्यामुळेच हे सारे फितूर दिसत आहे. पैगंबरची दृष्टि फार खोलपर्यंत जाते. ते म्हणतात, मनातील पाप धुवा. मनाला स्वच्छ करा. हृदय दुरूस्त ठेवा. मनाच्या बिघाडामुळेच अन्नावर निर्बंध लावण्यात आले. चोरबाजारी सुरू झाली आणि जेव्हा किमतीवर निर्बंध घालण्यात आले तेव्हा साहित्यच संपले. लोक आवश्यकतेच्या वस्तूंपासून वंचित राहू लागले. जोपर्यंत मानवाचे पापी मन दुरूस्त होत नाही काहीच होणे शक्य नाही. साम्यवादाने देखील या सत्याकडे डोळे झाक केली आहे. कारण बिघाड आतून सुरू होतो. तेथे ही मनाची कोणतीच काळजी घेतली गेली नाही. मजुरांवर उपासमारीची पाळी आली आहे. ते त्यांच्या रक्त व धामावर विलासी जीवन जगत आहेत. त्यांच्या शवावर आलीशान इमारती बांधत आहेत. त्यांनी अशी परिस्थिती निर्माण करून ठेवली आहे की सगळीकडे मनमानी चालली आहे.



www.abulhasanalinadwi.org

## नशाबंदीच्या प्रयत्नात अमेरिका असफल :-

आमचा समाज पापी बनला आहे. जुलूमाकरण्याचा कल वाढला आहे. फक्त तक्रार केल्याने जणात सुधारणा होऊ शकत नाही. हृदय फक्त अल्लाहच्या भयानेच सुधरू शकते. ते केवळ पैगंबरांच्या दर्शविल्या मार्गानेच दुरूस्त होऊ शकते. जर फक्त ज्ञान, कला व विज्ञाने दुरूस्त झाले असते तर युरोपा मन पूर्णपणे पापमुक्त झाले असते. अमेरिकेत नशाबंदीसाठी योजना आखली गेली. युद्धापतळीवर पापले उचलली गेली. अमेरिकेने कोटयावादी रूपये त्यात घालवले. एक मोठे अभियान लावले. मद्याबंदीवर पूर्ण शक्ति झोकून दिली. त्या करिता भव्य नि विशाल साहित्य छापण्यात आले. ते एवढे की जर सगळी वर्तमानपत्रे, भित्तीपत्रे, जाहिराती आणि पुस्तिकांना पसरले तर कित्येक मैलांपर्यंत ते जातील. पण जितके प्रयंत्न केले गेलेत. अमेरिकेतील सुशिक्षित व सुसंस्कृत जनतेस त्याची अधिकच चीड वाटून ते अधिक जोराने मद्यपान करू लागले. शेवटी सरकार हतबल झाली. सरकारने आपले पराजय मान्य करून कायदा परत घेला. हे याचे प्रमाण आहे की बाह्यरूपी व्यवस्था व स्वत:ची बुध्दिने जे प्रयत्न केले जातात ते निष्फळ ठरतात. त्यांचा फार मोठा परिणाम दिसून येत नाही. अमेरिकेच्या सुशिक्षित, सुसंस्कृत दुनियेने साहित्याच्या वाजवी आणि सज्जड तर्कांची कडीमात्र काळजी बाळगली नाही. त्यांनी फक्त



www.abulhasanalinadwi.org

आपल्या मनातील इच्छांचाच विचार केला.

## देशासाठी सर्वात मोठे संकट :-

या देशात चारित्र्याची जी अनैतिकता माजली आहे ती तेच सर्वात मोठे संकट आहे. कथाव्दारे अश्लील गोष्टी पसरवण्याचे कार्य चालू आहे. आमच्या नवीन पिढीस निर्लज्जतेचे इंजेक्शन दिले जात आहेत. सिनेमाच्य पडद्यावर उघडपणे पापदाखतिले जात आहे. डोळ्यांकरवी, कानांकरवी हृदयात पाप उतरविला जात आहे. वर्तमान पत्रे मासिके राजरोसपणे अश्लीलतेचे प्रसार करताहेत. त्याचा कसालाच तोड नाही. आम्ही स्पाष्टपणे आव्हान करतो की आम्हास स्वातंत्र्य मिळाले ही जणू देवाची कृपाच आहे. पण आम्ही जर आपल्या चारित्र्याची काळजी वाहिली नाही तर स्वातंत्र्य टिकूच शकणार नाही.

## भारती आणि यूरोपातील फरक :-

यूरोपात हजारो अवगुण आहेत. पण तो थांबलेला.आहे. यात मुळीच शंका नाही की पाश्चात्यांच्या जीवनात मोठ्या प्रमाणात चारित्रिक गुन्हेगारी अश्लीलता दिसते. पण त्यांची वाढ हळूवारपणे होते आहे. ते लेहान सहान गोष्टीत नियमांचे पालन करणारे,आणि समय आहेत. त्यांच्यात खालच्या पातळीवरील लहान लहान फसबेगिरी आढळत नाही. त्यांना जबाबदारीची जाणीव आहे. त्यांचे शहरी व सामाजिक जीवन जास्त संघटित आहे. त्यात सुसूत्रात आहे. माझ्या एका मित्राने माहिती देताना सांगितले की ते लंडनच्या ब्रिटिश



www.abulhasanalinadwi.org

म्युझियममध्ये एक शैक्षणिक काम करत होते. ग्रंथालयासोबत तेथे उपहारगृहात असते. या उपहारगृहात सामान्यत मुलीच काम करतात. ते म्हणतात की माझा नित्याचा कार्यक्रम होता की थकल्यावर उपहारगृहात जाऊन मासोळीचे कबाब खात असे. जेवढे पैसे ते सांगत प्रति दिवस तेवढे पैसे देऊन येत असे. एके दिवशीची गोष्ट जेव्हा मी पैसे देऊ लागलो तेथील मॅनेजर बाई मला म्हणाली बरं ! आपण आहात. तुम्ही रोज दोन पैसे जास्त देऊन जात आहात आमचा हिशोब अधिक होत होता. आम्ही अनेक दिवसापासून त्या माणसाच्या शोधात होतो. जो जास्त बिल देऊन जातो आपणास चुकीने जास्त किंमत दाखविण्यात आली. हे आपले पैसे वेगळे ठेवण्यात आले आहेत. यूरोपियन मुलीत ईमानदारीचे गुण परमेश्वर भक्ति मुले आले नाही. तेथे चर्च अपयशी ठरले आहे. नैतिक मूल्ये व्यर्थ झालीत तेव्हा त्यांनी फक्त भौतिक लाभकरिता ती व्यापारी नैतिकता अवलंबिली आहे व असेमन बनविले जे एका सफल व्यापाऱ्यासाठी आवश्यक आहे.

**चरित्र्याचे दोन प्रकार :**

पाश्चात्य चारित्र्यात संतुलन नाही. याचे उदाहरण जणू असे की गूळ खावे नि गुलगुले खाऊ नये. व्यक्तींच्या लहानसहान बाबतीत ते फार इमानदारी दाखवतात पण जेव्हा आपल्या जातीचा प्रश्न येतो तेव्हा असे हे प्रामाणिक लोक इतरांना गिळंकृत करतात. व्यक्तिगत जीवनात ते असे की जर त्यांनी सकाळी ९ वाजून १२ मिनिटाला येण्याचे


www.abulhasanalinadwi.org

सांगितले तर त्याच वेळेवर पोचतील. पण जाती बाबत इत्तर जातींशी दगडबाजी करण्यास त्यांना तिळमात्र संकोच वाटत नाही. अरबांविषयी त्यांचे वचन भंगतर जगजाहीर आहे. याचा अनुभव आम्ही आमच्याच देशात अनुभव आहे. त्याच्यांतील नैतिकता ईश्वरभक्ति व मरणोपरांत जीवनात उत्तर द्यावेलागेल यामुळे नव्हे, तर लाभान्वित होण्या व समयोचित हिता करिता त्यांना नैतिक मन बनवावे लागले. स्वार्थपोटी सदाचारी नि वायद्याचे पषके आणि जेथे त्यांना आपल्या हित रक्षणात शंका वाटली तेव्हा ते अनैतिकता दाखवण्यास मागेपुढे पाहत नाहीत.

## पैगंबरांव्दारे सुजित आचार :-

पैगंबरांच्या शिकवणुकीमुळे बनलेले चरित्र्य स्थायी व स्वार्थपासून मुक्त असतात. नफा असो वा तोटा, जीवाची पर्वा न करता ते परम चारित्र्याचा त्याग करीत नाही. आँ हजरत मोहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लमच्या शिकवणीने असे मन बनले होते की खलीफा उमर बिन अब्दुल अजीज रजियल्लाहु अन्हु जे सुसंस्कृत दुनियेचे सर्वोच्च शासक होते एक रात्री शासकीय कार्यकरत होते. सरकारी दिवा जळत होता. एक गृहस्थ भेटीसाठी आले. त्यांनी सलाम करनू मिजासाची पृच्छा केली. खलीफाने उत्तर देण्यापूर्वी दिवा बुजवला. मग एक दुसरा मामूली दिवा आणला. त्या गृहस्थाने विचारले तुम्ही असे का केले ? खलीफा उत्तरले, तो राज्य कोषाचा दिवा होता. तुम्ही खाजगी



www.abulhasanalinadwi.org

गोष्ट विचारीत होता. म्हणून मीत्यास विजवले. त्याच्या प्रकाशात जर मी खाजगी गोष्टी केल्या तर अल्लाहला काय उत्तर मी देऊ शकेन? असे दक्षतेचे नमूने क्रेमलिनच्या हद्दीत दिसू शकतीलकाय ? ही नैतिक मूल्ये नी आत्मिक उंची त्याच्या ध्यानी मनी येऊच शकत नाही. जास्तीत जास्त ते इत्केच विचार करू शकतात आणि त्यांच्या विचारची उडान इथपर्यंतच सीमित आहे की प्रत्येक माणसाला पोटभर जेवण, औषधव राहण्याकरिता घर हवे. त्याच्याकडून बिगारीचे काम घेऊ नये. त्यांच्या भाव भावनांचा आदर करावा वगैरे.

दुसरे खलीफा हजरत उमर रजियल्लाह अन्हु ज्यांनी रोम व ईरान सारखी महान राज्ये जिंकली होती, त्यांच्या काळी जेव्हां दुष्काळ पडला, त्यांनी चांगले जेवळ घेणे सोडिले. ते गोरेपान होते. पण तेल सेवन केल्यामुळे त्यांच्या चेहऱ्याचा रंग काळवडला.

## देशप्रेम व देशभक्ति:-

आमची गोष्ट अगदी सरळ निसादी. ती म्हणजे परमेश्वराच्या मार्गावर चालण्याचे आमंत्रण देण्यास आलो आहोत. सत्याच्या आचरणाळाचा मी महान देश सेवा नि देशभक्ति मानतो. आम्हापेक्षा अधिक कोणी याची सेवा करू शकत नाही. हे आम्हास मान्य की देशात अशासंस्थांची आवश्यकता आहेत ज्यांच्याव्दारे देशोन्नती घडून यावी. आम्ही अशासंस्थांची निंदा करत नाही. देशासाठी शैक्षणिक संस्था, दवाखाने, स्वचछता विभागाची गरज आहे.



www.abulhasanalinadwi.org

देशाकरिता यातायात, संरक्षणासारखे विभाग तर फारच आवश्यक आहेत. या खेरीज देशात अत्याचार, अंधेरनगरी, एकमेकांच्या पोटा्वर पायदेणे ही महामारी मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. जर यास लगाम दिली नाही. तर देशाची मानमर्यादा, त्याचे स्वातंत्र्य धुळीस मिळतील. आम्ही सगळ्यांना हेच सांगतो की यालाच अव्वल प्राथमिकता द्यावी. त्यासाऱ्या संस्था ज्यांना पूर्वी मी उपयोगी म्हटले शेवटी येतात. सत्याच्या प्रचारासाठीच मी घराबाहेर निघालो आहे. सत्याचरणाचे कार्यजर कोणी केले असते तर त्याच्याशी निश्चित सहकार्य केले असते.

**आमचे आमंत्रण:-**

आम्ही स्पष्टपणे प्रतिपादित करितो की संपत्तीत सहभागी होण्यासाठी या देशात आलो नाहीत. जे धनवान देश होते ते सोडून आम्ही येथे आलो. आम्ही सेवेची भावना घेऊन येथे आलो होतो. आम्ही ईश्वराने निर्माण केलेल्या मानवास खऱ्या अर्थाने देवदास बनविण्या करिता येथे आलो होतो. येथे जे मुसलमान आले होते ते चरित्र्य,प्रेम, देशभक्तिचा संदेश घेऊन आले होते. त्यांनी या देशात काहीतरी दिले, घेतलेनाही, ते काही घेण्यासाठी इथे आले नव्हते. जर त्यांनी स्वाहिताचा विचार केला असता तर इटालाची इतकी भव्य मशीदते बांधूच शकले नसते. ते तर देवभक्ति नि मानव प्रेमाचे आवाहन करण्याकरिता आले होते. कुठले अरब नि कुठले गैरअरब सर्वकाही आम्हा म्हणजे स्वत:निर्मित हद्दी


www.abulhasanalinadwi.org

आहेत. या संसाराचा निर्माता, स्वामी, पोशिंदा आणि साऱ्याजगास कोणाच्या भागीदारी विना एक अल्लाहकडून त्यांनी ही शिकवण आणिली होती. त्यांनी जगाकडून काही न घेता साऱ्या विश्वाची सेवा केली. त्यांनी सच्चया मोत्यांनी मानवतेची झोली भरली. ते स्वत: रितेहातच रहिलेत. आपल्या मुत्राकाळांची मुळीच काळजी वाहिली नाही. आपल्या कुटुंबाचा हित न पाहता स्वत: उपाशी पोटी राहून जनतेची सेवा केली. त्यांचे दु:खमय जीवन सुखी समाधानी केले. जे आलें ते गरिबांना देऊन टाकले. गरजमंतांच्या झोळ्या भरल्या.त्यांना सेवक दिलेत. आणि आपल्या बाळांना अगदी वंचित ठेविले. एकदा रसुलूल्लाह सल्लल्लाहु अलै हि वसल्लम चटईवर झोपलेले होते. अंगावर चटईचे वळ पडले होते. हजरत उमर ने हे पाहताच ते उद गारले. अल्लाहु अकबर ! आपण अल्लाहचे प्रेषित असूनदेखील अशा हालअपेष्टा सहन करता. आणि जगाचे शोषण करणाऱ्या जुल्मींना गालीच्यावर निमंचावर विश्रांती करविता. आँहजरत रसुलूल्लाह सल्लल्लाहु अलै हि वसल्लम म्हणाले, उमर ! ऐशाराम तर खऱ्या अर्थी परलोकातील ऐशाराम आहे.

## मुसलमानांची चूक :-

मी मुसलमानांशी कडू बोलतो. मी त्यांना म्हणतो तुम्ही या गोष्टी मान्य करता. त्यावर तुमचा ईमान आहे. तुम्ही सत्यशीलतेचा त्याग करून पशूंच्या पातळीवर आलात. तुम्ही आपल्या चरित्र्यद्य नि कार्याद्वारे [illegible] धर्माची



www.abulhasanalinadwi.org

बदनामी करता आहात. त्याच्या उच्चवल नामास बट्टा लावता आहात. तुम्ही जगाला इस्लामी जीवनाचे जे चलचित्र दाखवत आहात ते फार दु:खदायक आहे. तुम्ही जो जीवनाचा आदर्श जगापुढे ठेवला त्यात कोणचे आकर्षण आहे. पूर्वी तुम्ही ज्या मार्गावर निघत असा आपले प्रतीक सोडत जात होता. दीर्घकाळापर्यंत त्या वाटेवर सुगंध दर्वळत असे. एक आनंदमयी वातावरणाची अनुभूती होत असे. मुसलमान ज्या वाटेने निघाले ती वाट सुगंधिली गेली. जेथून ते आले तेथून संदेश पाठवण्यात आले की आमच्या देशात सर्वकाही आहे पण मुसलमान नाहीत की ज्यांना पाहून लोक आपले जीवन सत्यमार्गी लावतील. जे त्यांच्या खटल्यांवर तटस्थ होऊन निर्णय देतील. त्यांच्या म्हणण्यावरून तेथे मुसलमान पाठविले गेले. अतिशय खेदाची गोष्ट ! की आता तुम्ही असे बनलात की तुमच्या नसल्याने देशातील उणिवेचा अनुभव होत नाही. आज पर्यंतचा इतिहास पाहा. काकोणी आपल्या देशातून तज्ञ कलाकीर, डॉक्टर यांना देशाबाहेर होण्याचा आदेश दिला आहे का ? पूर्वपंजाबात लोखंडी काम करणाऱ्यांची आवश्यकता होती. तेव्हा ते धुडाळून आणून त्यांन बसविले. तुमच्या जर शलिवानतेचे प्राबल्य असते तर चारित्रिक अभाव त्यांना बाध्य करू शकला असता की तुम्हास देशाची अनामत म्हणून ठेविले जावे. तुमचे दूधवाले पाणी भेसळास पाप समजले असते, तुमचे शिंपी कापड चोरण्यास वैगुण्य समजले असते. तुमचे कारागीर व मजूर कष्टकरून



www.abulhasanalinadwi.org

दिवसभर काम केले असते. तुमच्या शासकांनी लाचखोरी केली नसती. अशावेळी जगावरील कोणताच देश तुमचा विरह करू शकला नसा.

## एकाच जहाजातील प्रवासी :-

आपल्या देशबांधवांवर माझे हार्दिक प्रेम आमचे आपले भवितव्य एकमेकांशी निगडीत आहे. आपण चांगले तर आम्ही देखील चांगले. आपले दु:ख आमचे दु:ख आहेत. अल्लाहाचे प्रेषित कोणा एका विशिष्ट देशाच्या सुधाराकरिता आले नाहीत. ते साऱ्या जगासाठी करूणेचे रूप धारण करून आले आहेत. وَمَا أرسلنك آلا رَحمَةً لّلعَالمِين
अल्लाहाचे शेवटचे प्रेषित हजरत मोहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम येऊन अरबांच्या जाती विषयीच्या गर्वास नेस्तनाबूद केले. ते म्हणाले, अल्लाहने तुमच्या वांशिक गर्वास तोडिले आहे. मी त्यास आपल्या पायाखाली तुडवीत आहे. अरबीला गैर अरबीवर कसलेच प्राधान्य नाही. तुम्ही सारे आदमची संतान आहात व आदमचा निर्माण माती पासून करण्यात आला होता. आम्ही सगळे एकाच जहाजाचे प्रवासी आहोत. जहाजात एक वरचा मजला आहे. आणि एक खालचा. खालच्यांनी त्या जर भोक केले आणि वरच्यांनी त्यांना रोखले नाही तर जहाज बुडून जाईल. आज आमच्या राष्ट्राच्या जीवनात खालच्या भागात भोक केले जात आहे. त्यास रोखण्याचा प्रयत्न करावा. त्यात पायजामा नि धोती असला कोणताच फरक नाही. कोणत्याही संस्कृतीचे बंधन



www.abulhasanalinadwi.org

नाही. समुद्र कोणाला जुमानत नाही. आम्हास अल्लाहने सुबुध्दि द्यावी. हृदयात ज्योत प्रज्वलित करावी. आम्ही इतरांच्या वेदना अनुभवाव्यात. आमच्या प्रिय राष्ट्रास ज्यावर आमचा हक्क आहे. ज्याचे आम्ही आपल्या घामाने रक्ताने सिंचन केले. त्या देशास आम्ही पैगंबरांनी दर्शविल्या मार्गावर चालून सुशोभित करावे. आम्ही त्यास एक आदर्श करावे. ज्यात ईमान, आस्था, चारित्र्य, मानवता, सौहार्दय आणि त्यागाचे वातावरण असावे. त्या करिता एका साहसी पाकलाची गरज आहे. पाऊल उचला, साहस करा. मी बोलून चालून माझ्या मनाचे ओझे हलके केले. आपण याचा भार उचलावा. हे ओझे माझ्या एकट्यानेत पेलणार नाही. याचा प्रचार करावा गांभीर्याने विचार करून त्यासाठी काही करण्याचा निश्चय करावा.

मौलाना सैय्यद अबुलहसन अली नदवी



www.abulhasanalinadwi.org